भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत सन २०२२-२३ या वर्षासाठी विकासकामांना मंजुरी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक : सावियो-२०२३ /प्र.क्र. २०३ /अजाक**
**मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक: २४ मार्च, २०२३.**

**वाचा :** १. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिनांक ०९ मार्च, २०१८.
२. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिनांक २८ जुलै,२०२१.

**प्रस्तावना:**

राज्यातील नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा / गावांचा विकास करण्यासाठी या घटकांना मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना शासनस्तरावरुन मान्यता देण्यासाठी "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना" अशी राज्यस्तर योजना सन २०१८-१९ पासून राबविण्याचा निर्णय शासनाने उपरोक्त वाचा येथील शासन निर्णय, दिनांक ०९ मार्च, २०१८ अन्वये घेतलेला आहे. सदर योजनेमध्ये घ्यावयाच्या कामांमध्ये वाढ करुन त्यामध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्तींशी निगडीत स्थळे तसेच, सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्टया महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे, त्यांची स्मारके उभारणे व अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचा सांस्कृतिक विकास घडवून आणणे (उदा. वाचनालय, अभ्यासिका, धम्म केंद्र, विपश्यना केंद्र, प्रशिक्षण केंद्र) या कामांचा समावेश शासन निर्णय, दिनांक २८ जुलै, २०२१ अन्वये करण्यात आलेला आहे. त्यानुसार मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या नागरी व ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांमधील कामांना मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

राज्यातील नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत" सन २०२२-२३ या वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पीत तरतुदीतून या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट "अ"** येथील नमूद कामांना व त्याकरिता वितरीत करण्यात येणाऱ्या निधीला शासनाची मंजुरी देण्यात आहे.

२. मा. लोकप्रतिनिधी ज्या कार्यान्वयीन यंत्रणेकडून सदर कामे करण्याबाबत सुचवतील त्या कार्यान्वयीन यंत्रणेमार्फत सदर कामे करण्यात यावीत. उदा. सार्वजनिक बांधकाम

विभाग, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, ग्रामपंचायत किंवा शासनाचे अन्य विभाग.

३. कार्यान्वयीन यंत्रणेने तत्वत: मंजूर अंदाजित किंमतीच्या कामांबाबत कामाचा आरंभबिंदु व शेवटचा बिंदु यांचे अक्षांश व रेखांश नमुद करुन सविस्तर नकाशे/आराखडे व अंदाजपत्रके तयार करुन ती संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रशासकिय मान्यतेसाठी सादर करावीत. संबंधित जिल्हाधिकारी यांनी सदर कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करावी. कार्यान्विन यंत्रणेने शासनाच्या प्रचलित नियमानुसार कामांची निविदा प्रक्रिया राबवावी.

४. सदर कामे मंजूर अंदाजपत्रकीय किंमतीच्या मर्यादेतच पूर्ण होतील याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा जास्त खर्चाच्या कामांना प्रशासकिय मान्यता दिल्यास त्यासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही.

५. ज्या लोकप्रतिनिधींनी सदरची कामे सुचविली आहेत त्याच लोकप्रतिनिधींनी लेखी विनंती केल्यास त्या कामांमध्ये बदल करावयाचा असेल अथवा ती कामे काही अपरिहार्य कारणांमुळे करणे शक्य नसतील अशा कामांची खातरजमा करुन सदरची कामे रद्द करण्याबाबत अथवा बदल करण्याबाबतचे अधिकार शासनास राहतील.

६. कामे सुरु करण्यापूर्वी सदरची कामे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीमधीलच आहेत याची खातरजमा संबंधीत जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी करणे बंधनकारक आहे. जी कामे अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीबाहेरील असतील अशा कामांना निधी वितरित केल्यास त्याकरिता संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना जबाबदार धरण्यात येईल व त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

७. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेचे शासन निर्णय, दिनांक ०९ मार्च, २०१८, दिनांक २८ जुलै,२०२१ व दिनांक ८ ऑक्टोंबर, २०२१ या मधील अटी/शर्तीचे काटेकोरपणे पालन होईल, याची दक्षता घ्यावी.

८. सदर कामे सुरु करण्यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या कामांच्या क्षेत्रात कुठलीही सार्वत्रिक निवडणूक/पोट निवडणुकीसाठीची आचारसंहिता अंमलात नाही याबाबत संबंधीत जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांनी खात्री करावी.

९. सदर कामांचा खर्च हा सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय तरतूदीतील सदर योजनेकरिता वित्त विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून भागविण्यात येऊन पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा:

मागणी क्रमांक एन-३

| | |
|---|---|
| २२२५ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण |
| ०१ | अनुसूचित जातींचे कल्याण |

| | |
|---|---|
| ७८९ | अनुसूचित जाती उप योजना |
| (०४) | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना |
| (०४) (०१) | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना राबविणे (अ.जा.उ.यो.) (कार्यक्रम) |
| २७ | लहान बांधकामे |
| २२२५ एफ ०८५ | |

१०. सदर निधी कोषागारातून आहरीत करुन कार्यान्वयीन यंत्रणेला वितरीत करण्यासाठी दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ च्या शासन निर्णयान्वये संबंधीत जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून तसेच सहसचिव/ उप सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

२/३/२३

(प्रविण शिशुपाल)

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. सर्व मा. संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. सर्व विधानसभा सदस्य/ विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य,
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
८. मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१०. जिल्हाधिकारी, बीड/धुळे/रत्नागिरी/ पुणे/ मुंबई,
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड/धुळे/रत्नागिरी/ पुणे/ मुंबई,
१२. महानगरपालिका आयुक्त, बीड/धुळे/रत्नागिरी/ पुणे/ मुंबई,
१३. प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण विभाग, औरंगाबाद/ नाशिक/ मुंबई/ पुणे,
१४. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बीड/धुळे/रत्नागिरी/ पुणे/ मुंबई,
१५. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प/विघयो), सामाजिक न्याय व वि.स.विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवडनस्ती (अजाक).

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना

शासन निर्णय, क्रमांक : सावियो-२०२३/प्र.क्र.२०३ /अजाक

परिशिष्ट - अ

| अ. क्र. | कामाचे नाव | मंजूर निधी (रूपये लक्ष) | वितरीत निधी (२०%) |
|---|---|---|---|
| | **जिल्हा उस्मानाबाद** | | |
| १ | ग्रा. पं. इटकूर ता. कळंब, जि. धाराशिव येथील संतोष मोरे यांचे घर ते पिंटू शेंडगे यांचे घर साठे नगर येथे सी. सी. रोड तयार करणे | १०.०० | २.०० |
| २ | ग्रा. पं. इटकूर ता. कळंब, जि. धाराशिव येथील भीमनगर समाधान रणदिवे यांचे घर ते सुंदर शिंदे यांचे घर सी. सी. रोड करणे | १०.०० | २.०० |
| ३ | ग्रा. पं. मंगरूळ ता. कळंब, जि. धाराशिव येथील प्रभाकर कांबळे यांचे घर ते मच्छिंद्र तोरट यांच्या घरापर्यंत सी. सी. रोड करणे. | १०.०० | २.०० |
| ४ | ग्रा. पं. मंगरूळ ता. कळंब, जि. धाराशिव येथील शिवराज कांबळे यांचे घर ते शाहुराज कांबळे यांचे घरापर्यंत सी. सी. रोड करणे | १५.०० | ३.०० |
| | **एकूण** | ४५.०० | ९.०० |
| | **जिल्हा पालघर** | | |
| ५ | खोडाळा ता. मोखाडा, जि. पालघर येथील आंबेडकरनगर अंतर्गत रस्ता सुधारणा करणे | १०.०० | २.०० |
| ६ | आडोशी ता. मोखाडा, जि. पालघर येथील दलित वस्तीकडे जाणारा रस्ता सुधारणा करणे | १०.०० | २.०० |
| ७ | खोडाळा ता. मोखाडा, जि. पालघर येथील दलितवस्ती रस्ता पेव्हर ब्लॉक बसविणे. | ५.०० | १.०० |
| ८ | उधवा ता. तलासरी, जि. पालघर अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | १०.०० | २.०० |
| ९ | गिरगांव ता. तलासरी, जि. पालघर अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | १०.०० | २.०० |
| १० | सुत्रकार ता. तलासरी, जि. पालघर अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | १०.०० | २.०० |
| | **एकूण** | ५५.०० | ११.०० |
| | **जिल्हा पुणे** | | |
| ११ | सरदवाडी ता. शिरूर जिल्हा पुणे येथे सामाजिक सभागृह बांधणे | १५.०० | ३.०० |
| १२ | गोलेगाव ता. शिरूर जिल्हा पुणे येथे कल्याण गायकवाड वस्ती नं.-२ स्मशानभूमी बांधकाम करणे | १५.०० | ३.०० |
| १३ | गुनाट ता. शिरूर जिल्हा पुणे येथे लक्ष्मीआई मंदिर सभामंडप बांधणे | १०.०० | २.०० |
| १४ | आण्णापुर ता. शिरूर जिल्हा पुणे येथे दलित वस्ती अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे | १०.०० | २.०० |
| | **एकूण** | ५०.०० | १०.०० |
| | **जिल्हा कोल्हापूर** | | |
| १५ | कसबा सांगाव ता. कागल येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉंक्रीटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे. | ९.०० | १.८० |

Section Officer
to the Government of Maharashtra
Social Justice and Special Assistance
Department
Mantralaya, Mumbai 400 032

| अ. क्र. | कामाचे नाव | मंजूर निधी (रूपये लक्ष) | वितरीत निधी (२०%) |
|---|---|---|---|
| १६ | बाचणी ता. कागल येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉंक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे. | ७.०० | १.४० |
| १७ | कडगांव ता. गडहिंग्लज येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉंक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे | ७.०० | १.४० |
| १८ | आणूर ता. कागल येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉंक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे. | ५.०० | १.०० |
| १९ | चिमगांव ता. कागल येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉंक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे. | ५.०० | १.०० |
| २० | आर्दाळ ता. आजरा येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉंक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे. | ५.०० | १.०० |
| २१ | शिंदेवाडी ता. कागल येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉंक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे. | ५.०० | १.०० |
| २२ | व्हन्नूर ता. कागल येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉंक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे. | ५.०० | १.०० |
| २३ | कौलगे ता. गडहिंग्लज येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉंक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे. | ५.०० | १.०० |
| २४ | सावर्डे ता. कागल येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉंक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे. | ७.०० | १.४० |
| २५ | हळदवडे ता. कागल येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉंक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे. | ५.०० | १.०० |
| २६ | अवचितवाडी ता. कागल येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉंक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे. | ५.०० | १.०० |
| २७ | केनवडे ता. कागल येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉंक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे | ५.०० | १.०० |
| २८ | कुरणी ता. कागल येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉंक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे. | ५.०० | १.०० |
| २९ | सोहळे ता. आजरा येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉंक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे. | ५.०० | १.०० |
| ३० | होन्याळी ता. आजरा येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉंक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे. | ५.०० | १.०० |

to the G... Maharashtra
Social J... Assistance
...ment
Mantralaya, Mumbai 400 032

| अ. क्र. | कामाचे नाव | मंजूर निधी (रूपये लक्ष) | वितरीत निधी (२०%) |
|---|---|---|---|
| ३१ | गोरंबे ता. कागल येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे. | ५.०० | १.०० |
| ३२ | सोनळी ता. कागल येथील दलित वस्ती मध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, विद्युतीकरण, खुली जागा विकसित करणे, कॉक्रिटीकरण करणे, सामाजिक / खुले सभागृह आदी प्राथमिक सोयी सुविधांची कामे करणे | ५.०० | १.०० |
| | **एकूण** | १००.०० | २०.०० |
| | **जिल्हा रत्नागिरी** | | |
| ३३ | साखलोळी ता. दापोली मेनरोड ते बौध्दवाडी रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे | १०.०० | २.०० |
| ३४ | कुंभवे ता. दापोली बौध्दवाडी रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे | ७.५० | १.५० |
| ३५ | पंचनदी ता. दापोली बौध्दवाडी रस्त्याला संरक्षक भिंत बांधणे | ९.५० | १.९० |
| ३६ | दाभोळ ता. दापोली बाईतवाडी ते बौध्दवाडी नवीन रस्ता तयार करणे, खडीकरण करणे | ८.०० | १.६० |
| ३७ | शेवरे ता. मंडणगड बौध्दवाडी रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | ७.५० | १.५० |
| ३८ | चिंचघर ता. खेड बौध्दवाडी रस्त्याला संरक्षक भिंत बांधणे | ७.५० | १.५० |
| | **एकूण** | ५०.०० | १०.०० |
| | **जिल्हा नाशिक** | | |
| ३९ | मौजे बेलतगव्हान ता.जि. नाशिक येथे दलित वस्तित अनुषंगिक कामे करणे | १०.०० | २.०० |
| ४० | मौजे गिरणारे ता. जि. नाशिक येथे दलित वस्तित अनुषंगिक कामे करणे | १०.०० | २.०० |
| ४१ | मौजे वाडगाव ता. जि. नाशिक. येथे दलित वस्तित अनुषंगिक कामे करणे | १०.०० | २.०० |
| ४२ | मौजे एकलहरे ता.जि.नाशिक. येथे दलित वस्तित अनुषंगिक कामे करणे | १०.०० | २.०० |
| ४३ | मौजे लाखलगांव ता.जि.नाशिक येथे दलित वस्तित अनुषंगिक कामे करणे | १०.०० | २.०० |
| ४४ | मौजे गोवर्धन येथे ता. जि. नाशिक येथे दलित वस्ति सुनिल मोहिते यांच्या वस्तिपर्यंत रस्ता सुधारणा करणे | १०.०० | २.०० |
| ४५ | मौजे सारूळ ता.जि.नाशिक. येथे दलित वस्ती परिसरात अनुषंगिक कामे करणे | १०.०० | २.०० |
| ४६ | मौजे पिंपळद ता.जि. नाशिक येथे दलित वस्ति येथे अनुषंगिक कामे करणे | १०.०० | २.०० |
| ४७ | मौजे आंबेबहुला ता. जि. नाशिक येथे अनुषंगिक कामे करणे | १०.०० | २.०० |
| ४८ | मौजे देवरगांव ता.जि.नाशिक येथे दलित वस्तित अनुषंगिक कामे करणे | १०.०० | २.०० |
| | | १००.०० | २०.०० |
| | **एकूण** | ४००.०० | ८०.०० |

Section Officer
to the Government of Maharashtra
Social Justice and Special Assistance
Department
Mantralaya, Mumbai 400 032